दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | गुरुवार | 19 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 271 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com






परळी वैद्यनाथ येथील अश्वारूढ रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील दृश्य.

## अजित पवार यांच्या विमान अपघातावर सीबीआय चौकशीची मागणी

### पुत्र जय पवार यांची भावनिक प्रतिक्रिया

■ पुणे : वृत्तसंस्था



राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. अपघातामागे घातपाताची शक्यता असल्याचे काही नेत्यांकडून सूचक विधान करण्यात येत असल्याने राज्यातच नव्हे तर देशभरातही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर मंगळवारी (१७ फेब्रुवारी) उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अजित पवार गटातील वरिष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या वेळी अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआयमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले. दरम्यान, या प्रकरणावर अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांनी पहिल्यांदाच भाष्य केले आहे. त्यांनी इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे भावना व्यक्त करत म्हटले की, "विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला या हृदयद्रावक दुर्घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा अधिकार आहे." यासोबतच त्यांनी संबंधित विमान सेवा कंपनी VSR ला तत्काळ उड्डाणे चालवण्यास बंदी घालण्याची मागणी केली असून, त्यांच्या विमानांच्या देखभालीत संभाव्य गंभीर गैरव्यवहार झाले असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. या सर्व बाबींची निष्पक्ष आणि सखोल चौकशी व्हावी, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. भावनिक शब्दांत "Miss You Dad" असे म्हणत जय पवार यांनी वडिलांची आठवण काढली.

दरम्यान, या प्रकरणी सीबीआय चौकशीबाबत राज्य सरकार कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अपघात की घातपात? या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर मिळवण्यासाठी आता सर्वसामान्य जनतेचीही मागणी तीव्र होताना दिसत आहे.

## विलिनीकरणाला विरोध करणाऱ्यांकडून घातपाताचा संशय?

### विमान दुर्घटनेबाबत आमदार रोहित पवार यांची मागणी; सखोल चौकशीची गरज



मुंबई | वृत्तसंस्था

अजित पवार गटाच्या विलिनीकरणाला आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागाला विरोध करणाऱ्या काही घटकांकडून घातपात घडवून आणल्याचा संशय व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते तथा आमदार रोहित पवार यांनी विमान दुर्घटनेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार यांनी विविध तांत्रिक मुद्दे उपस्थित करत दुर्घटनेच्या कारणांबाबत शंका व्यक्त केली. ब्लॅक बॉक्स सुमारे ९,९०० अंश सेल्सिअस तापमान सहन करू शकतो, मात्र विमानाच्या शेपटाकडील भाग सुरक्षित असताना ब्लॅक बॉक्स कसा जळाला, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. डीजीसीएकडे याच प्रकारच्या लोडर जेट विमानांची नोंद असल्याचे सांगत तपास प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना जय पवार यांनी संबंधित 'व्हीएसआर' कंपनीवर बंदी घालण्याची मागणी केली. अपघातग्रस्त विमान कंपनीची जबाबदारी निश्चित करून संभाव्य गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी व्हावी, तसेच सीआयडी, डीजीसीए आणि अन्य परदेशी संस्थांकडून संयुक्त तपास करण्यात यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या दुर्घटनेपूर्वी काही दिवसांपासून राजकीय घडामोडींची चर्चा सुरू होती. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापलेले असताना हा अपघात घडल्याने संशय अधिक गडद झाल्याचेही पवार यांनी सूचित केले. तसेच अपघातग्रस्त विमानात अतिरिक्त इंधन भरल्याची शक्यता, इंधनाचे कॅन ठेवले गेल्याचा संशय आणि ब्लॅकमेलसारख्या बाबींवरही त्यांनी अप्रत्यक्षपणे भाष्य केले. त्यामुळे या संपूर्ण घटनेची बहुआयामी चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, तपास यंत्रणांकडून अधिकृत अहवाल अद्याप समोर न आल्याने या दुर्घटनेभोवतीचे गूढ कायम असून या प्रकरणाकडे राज्यातील राजकीय व प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## परळी वैजनाथ नगर परिषदेतील रिक्त 32 पदे तातडीने भरण्याची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सकारात्मक

■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी.....

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व नगरपरिषदेच्या वतीने परळीचे माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी व बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन परळी नगर परिषदेतील वर्ग-३, वर्ग-४ तसेच अनुकंपा तत्वावरील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली. यासंदर्भात जिल्हा निवड समितीमार्फत भरती प्रक्रिया लवकरात लवकर राबविण्याबाबत सविस्तर निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी हा विषय प्राधान्याने हाताळून सकारात्मक कार्यवाही करू, असे अभिवचन दिल्याची माहिती धर्माधिकारी यांनी दिली.

परळी नगर परिषदेत गेल्या अनेक वर्षांपासून लिपिक-टंकलेखक, लघुटंकलेखक, उद्यान पर्यवेक्षक, सहाय्यक ग्रंथपाल, पंप ऑपरेटर, तारतंत्री ऑपरेटर, वाहन चालक-कम-ऑपरेटर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, शिपाई, फायरमन आदी एकूण २३ पदे रिक्त आहेत. याशिवाय अनुकंपा तत्वावरील ९ उमेदवारांचे अर्ज प्रलंबित असून त्यांनाही न्याय देण्यासाठी तत्काळ नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. वर्ग-३, वर्ग-४ आणि अनुकंपा तत्वावरील एकूण ३२ पदे भरल्यास नगर परिषदेतील स्थायी कर्मचाऱ्यांची संख्या वाढून प्रशासकीय कामकाजाला गती मिळेल तसेच शहराच्या विकासकामांना चालना मिळेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.




## वेतनत्रुटींच्या प्रश्नावर कर्मचाऱ्यांचा संताप जीआरची प्रतीकात्मक होळी

### 16 फेब्रुवारीपासून राज्यभर असहकार कामबंद आंदोलन



■ परळी | प्रतिनिधी

जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दि. १६ फेब्रुवारी २०२६ पासून राज्यभर असहकार कामबंद आंदोलन छेडण्यात आले असून विविध प्रलंबित मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी ठाम भूमिका घेतली आहे. लिपिक वर्गीय वेतनत्रुटी तात्काळ दूर कराव्यात, दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी तसेच इतर प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर माजलगाव पाटबंधारे विभाग, ता. परळी, जि. बीड येथील कार्यकारी अभियंत्यांना संघटनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. शासनाच्या पत्राचा संदर्भ देत आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय संबंधित कर्मचाऱ्यांनी जाहीर केला आहे.

दरम्यान, फुल्लर समितीच्या वेतनत्रुटी सुधारणा प्रक्रियेत लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नसल्यामुळे लिपिक वर्गावर अन्याय होत असल्याचा आरोप संघटनेने केला. या निषेधार्थ संबंधित शासन निर्णयाची (जीआर) प्रतीकात्मक होळी करण्यात येत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, शासनाने मागण्यांकडे तातडीने सकारात्मक दखल घेतली नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. राज्यभर सुरू असलेल्या या असहकार कामबंद आंदोलनामुळे शासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात असून प्रशासनाचे लक्ष आता या आंदोलनाकडे लागले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्त्रीविषयक धोरण: सन्मान, सुरक्षितता आणि सुशासनाचा आदर्श

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचा विचार केला तर त्यांच्या पराक्रमासोबतच स्त्रीविषयक धोरण हा अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी पैलू म्हणून समोर येतो. 17 व्या शतकातील समाजव्यवस्था युद्धे, राजकीय अस्थिरता आणि सामाजिक विषमता यांमुळे असुरक्षित होती. युद्धांमध्ये स्त्रियांवर अत्याचार होणे आणि त्यांचा अपमान होणे ही दुर्दैवी पण सामान्य बाब मानली जात असे. अशा काळात शिवाजी महाराजांनी स्त्रीचा सन्मान हा राज्यकारभाराचा मूलभूत सिद्धांत मानून समाजाला नवा नैतिक आदर्श दिला.**

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या आई राजमाता जिजाबाई यांनी बालपणापासून धर्म, न्याय आणि स्त्रीचा आदर करण्याचे संस्कार दिले. जिजाऊंच्या शिकवणीतूनच स्त्रीला सन्मान देणे हे कर्तव्य आहे, ही भावना शिवाजी महाराजांच्या मनात दृढ झाली. वडील शहाजी राजे भोसले यांच्या शौर्य आणि दूरदृष्टीमुळे नेतृत्वगुण विकसित झाले. या संस्कारांच्या पायावर त्यांनी पुढे स्त्रीसन्मानाला राज्यनीतीचा भाग बनवले.

शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याला स्पष्ट आदेश दिले होते की कोणत्याही स्त्रीचा अपमान सहन केला जाणार नाही. युद्धाच्या वेळी शत्रूपक्षातील स्त्रियांनाही सन्मानाने वागवले जाईल, हा नियम त्यांनी कठोरपणे अंमलात आणला. सैनिकांनी स्त्रियांशी गैरवर्तन केल्यास कठोर शिक्षा केली जाईल, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली. यामुळे त्यांच्या सैन्यात नैतिक शिस्त निर्माण झाली आणि समाजात सुरक्षिततेची भावना वाढली.

कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानपूर्वक परत पाठवण्याची घटना शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक धोरणाचे सर्वात प्रसिद्ध उदाहरण मानली जाते. या प्रसंगातून त्यांनी दाखवून दिले की विजयाचा अर्थ स्त्रियांचा अपमान नसून मानवतेचा सन्मान आहे. ही घटना केवळ इतिहासातील प्रसंग नाही, तर नैतिक नेतृत्वाचे प्रतीक आहे.

शिवाजी महाराजांच्या दृष्टीने स्त्री ही समाजाच्या प्रतिष्ठेची आणि संस्कृतीची वाहक होती. त्यांनी प्रशासनात नैतिकता आणि शिस्त यांना महत्त्व दिले. स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी अनुकूल वातावरण निर्माण करून त्यांनी समाजात विश्वास निर्माण केला. सैनिकांना संयम, आदर आणि जबाबदारीची शिकवण देत त्यांनी स्त्रीसन्मान हा समाजाच्या संस्कारांचा भाग बनवला.

आजच्या काळात महिला सक्षमीकरण, लैंगिक समानता आणि स्त्रीसुरक्षेवर व्यापक चर्चा होत असताना शिवाजी महाराजांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी दाखवून दिले की खरा विकास तोच, जिथे स्त्री सुरक्षित आणि सन्मानित असते. समाजाच्या प्रगतीसाठी स्त्रीचा सन्मान आणि सहभाग आवश्यक आहे, हा संदेश त्यांच्या कार्यातून स्पष्ट दिसतो.

शिवाजी महाराजांचे स्त्रीविषयक धोरण केवळ संरक्षणापुरते मर्यादित नव्हते; ते मूल्याधिष्ठित समाजरचनेचे उदाहरण होते. त्यांनी स्त्रियांचा सन्मान राखणे हे शासनाचे आणि समाजाचे कर्तव्य मानले. त्यांच्या निर्णयांमध्ये नैतिकतेला सर्वोच्च स्थान दिले गेले. त्यामुळे त्यांच्या राज्यात स्त्रियांसाठी सुरक्षित आणि सन्माननीय वातावरण निर्माण झाले.

आजच्या स्त्रियांनी या इतिहासाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. स्त्रीसन्मानाची परंपरा टिकवण्यासाठी शिक्षण, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभाग महत्त्वाचा आहे. शिवाजी महाराजांनी दिलेला संदेश म्हणजे आत्मसन्मान आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय होय. समाजानेही स्त्रीच्या अधिकारांचा आदर राखून समानतेचे वातावरण निर्माण केले पाहिजे.

शिवजयंतीच्या निमित्ताने आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या या स्त्रीविषयक धोरणाचे स्मरण करून समाजात सन्मान आणि संवेदनशीलतेची भावना वाढवण्याचा संकल्प केला पाहिजे. स्त्रीचा सन्मान राखणे म्हणजे संस्कृतीचे रक्षण करणे, हा शिवरायांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

निष्कर्षतः, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्त्रीविषयक धोरण हे सुशासन, नैतिकता आणि मानवतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांनी राज्यकारभारातून स्त्रीसन्मानाची जी परंपरा निर्माण केली, ती आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांचा स्वीकार करून आपण अधिक न्याय्य, संवेदनशील आणि समतोल समाज घडवू शकतो.

**- डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**



लोकजागर

## लोकसेवार्थ : देशसेवा फाउंडेशनचा गरजूंना आधार

कोरोना काळात आपण अनेक वाईट प्रसंगांचा सामना केला, अनेक कठीण अनुभव घेतले. पण, याच काळात काही चांगल्या गोष्टींची सुरुवात देखील झाली. कोरोना काळात स्थापन झालेलं 'देशसेवा फाउंडेशन' हे त्यापैकीच एक आहे. या संस्थेने स्थापनेपासून आजपर्यंत असंख्य गरजूंना मदतीचा हात दिला आहे. गरीब, वंचित किंवा कोणत्याही प्रकारच्या मदतीची गरज असलेल्या व्यक्तीला ही संस्था निस्वार्थपणे मदत करते.

देशसेवा फाउंडेशनने आजवर 1000 हून अधिक गरजूंना रेशन किट्स वितरित केल्या आहेत. लॉकडाऊनपासून सुरू झालेल्या या उपक्रमाचा अनेक एकल कुटुंब, कामगार, वृद्ध आणि विधवा महिलांना लाभ झाला आहे. याशिवाय, आषाढी एकादशीनिमित्त 100 तुळशीच्या रोपांचे वाटप, महिलांसाठी दर महिन्याला सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप, वृद्धांसाठी



च्यवनप्राश आणि लहान मुलांसाठी ओडोमॉस बँड वाटप, असे विविध उपक्रम या संस्थेकडून राबवले जात आहेत. देशसेवा फाउंडेशन केवळ अन्न, वस्त्र किंवा औषधपुरतं मर्यादित नसून, गरजूंना प्रशासकीय स्तरावरही मदत करते. वृद्धांना पेन्शन मिळवण्यासाठी मार्गदर्शन करणे, फॉर्म भरून देणे, बँकेतील अडचणी सोडवणे, अशा कामांमध्येही संस्था पुढाकार घेते.संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष नरेंद्र पारखे यांनी सांगितलं की, ते कोणत्याही राजकीय पक्षाशी जोडलेले नाहीत. मात्र, समाजातील वेदना पाहून त्यांचं मन हेलावलं. त्यामुळेच त्यांनी देशसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून गरजूंची सेवा सुरू केली. ही केवळ मदत नसून माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी केलेला प्रयत्न आहे.संस्थेच्या पारदर्शक कार्यपद्धतीमुळे अनेक नागरिक स्वतःहून संपर्क करून मदत मागतात. अनेकजण आर्थिक मदत देखील करतात. कारण, या संस्थेला मिळालेलं दान योग्य वेळी गरजूंपर्यंत पोहचवलं जातं, याची लोकांना खात्री वाटते.एकूणच देशसेवा फौंडेशन चे हे गरीबंसाठीचे समाजकार्य नक्कीच कौतुकास्पद आणि आदर्शवर्त असेच आहे.

## राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या साक्षी मोरेची निवड



**घाटकोपर,(केतन भोज)**

मुंबई विद्यापीठाच्या वतीने सोनूभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर, ठाणे येथे नुकतेच मुंबई विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालय कुस्ती (महिला) स्पर्धा 2025-26 चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम) येथील इंदिरा गांधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी संजय मोरे (एफ. वाय.बी.ए.) हिने 57 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले, तर अमृताकुमारी लक्ष्मण यादव (टी. वाय.बी.ए.) हिने 50 किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले.

मुंबई विद्यापीठाने सुवर्णपदक पटकावणारी साक्षी मोरे हिची दि. 17 ते 20 मार्च 2026 या कालावधीत कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र, हरियाणा येथे संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती (महिला) स्पर्धा 2025-26 साठी निवड जाहीर केली आहे. 2025-26 या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कबड्डी, कुस्ती (पुरुष), 5 व 10 किलोमीटर धावणे व क्रॉस कंट्री स्पर्धांसाठी निवड झाली आहे.

महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणाऱ्या साक्षी मोरे हिचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेच्या अध्यक्ष पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे , संस्थेचे विश्वस्त व महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र म्हात्रे , प्रभाग 123 चे नगरसेवक सुनील मोरे यांनी तिचे व तिला मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक सतीश कदम यांचे अभिनंदन केले असून तिला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## शून्यातून विश्व : जनसामान्यांच्या गृहस्वप्नांची पूर्ती करणारा उद्योजक

काहीजण शून्यातून विश्व निर्माण करतात, असे आपण नेहमी वाचतो, पाहतो. पण, शून्याच्या खाली म्हणजे अक्षरशः हाती काहीच नसताना केवळ आपल्या जिद्दीच्या, कर्तृत्वाच्या, दूरदृष्टीच्या आणि अफाट मेहनतीच्या जोरावर प्रचंड मोठे विश्व उभे करणारी व्यक्तीदेखील असते, हे एका अतिसामान्य परिस्थितीमधून वर येऊन, आपले प्रचंड साम्राज्य उभे करून, एका ध्येयवेड्या युवकाने दाखवून दिलेले आहे. या कर्तृत्ववान व्यक्तीचे नाव आहे सचिन रघुनाथ भोसले. फलटण पंचक्रोशीतच नव्हे, तर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात हे नाव आज खूप प्रसिद्ध आहे.सचिन भोसले यांच्या आयुष्याचा प्रवास खूप कष्टाचा आणि मेहनतीचा होता. पण, या खडतर प्रवासात ते थकले नाहीत, थांबले नाहीत, तर नव्या वाटा शोधून आपल्या कौशल्याने, आत्मविश्वासाने आणि दूरदृष्टीने या खडतर प्रवासाला सुखाच्या 'हाय-वे' मध्ये त्यांनी बदललं.

२००२साली सचिन यांनी पिठाची गिरणी सुरू केली आणि पुढच्याच वर्षी स्वतःचे किराणामालाचे छोटेसे दुकानही सुरू केले. त्यानंतर एकदा ते मुंबईला बहिणीकडे गेले होते. तिकडे असताना तिकडच्या मंडईमध्ये फिरताना त्यांना असे लक्षात आले की, मुंबईमध्ये भाजीपाल्याचे दर फलटणच्या तुलनेत अतिशय जास्त आहेत. यावरून सचिन यांची व्यावसायिक वृत्ती जागृत झाली आणि या व्यवसायामधील प्रचंड क्षमता पाहून, त्यांनी घरचा भाजीपाला व्यवसाय मुंबईमध्ये विस्तारायचे ठरवले. तेथील मार्केटचा अभ्यास करून फलटणवरून मुंबईत नेऊन भाजीपाला विक्रीचा व्यवसाय सुरू केला. तिथे सचिन



यांचा चांगलाच जम बसला. भाजीपाला व्यवसायाच्या जोडीला 2007 साली त्यांनी दुधाचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी गोठा बांधला. पण, अजून काहीतरी नवीन आणि मोठे करण्याचे ध्येय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. यातूनच सचिन यांना एक नवीन व्यवसाय करायचे सुचले. सचिन यांना निसर्गाची आवड होतीच.या आवडीतूनच, त्यांच्या मुलीच्या जन्माच्या दिवशीच त्यांनी 'अष्टविनायक रोपवाटिका' नावाने रोपवाटिकेचा व्यवसाय सुरू केला.त्या एका छोट्याशा व्यवसायाचा विस्तार होत जाऊन सचिन यांच्या मालकीच्या आज तब्बल १३ नर्सरी आहेत. या नर्सरी सातारा, पुणे, सोलापूर जिल्ह्यांत वेगवेगळ्या ठिकाणी असून यामध्ये 'ऑरगॅनिक' भाजीपाला तयार करणार्या नर्सरींचासुद्धा समावेश आहे.

त्यानंतर अंगभूत व्यावसायिक वृत्ती ठासून भरलेल्या सचिन भोसले यांचे लक्ष बांधकाम व्यवसायाकडे गेले. २०१०साली त्यांनी फलटणजवळ स्वतःसाठी नवीन फ्लॅट घेण्याचे ठरवले. जेव्हा ते फ्लॅट घेण्यासाठी बिल्डरकडे बुकिंगची रक्कम देण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना समजले की, तो बिल्डर अशिक्षित आहे. त्या व्यक्तीला साधी सहीदेखील करता येत नाही. याचे कारण म्हणजे 'रिअल इस्टेट' क्षेत्रात शिक्षणापेक्षा 'ज्ञान' आणि 'भांडवल' हे अधिक महत्त्वाचे, हे सचिन यांच्या लक्षात आले. त्यांनी लगेच तो 'बुकिंग' केलेला फ्लॅट रद्द केला आणि परत आले. फलटणमध्ये त्यांनी त्यांचे चार मित्र, इंजिनिअर आणि सीए लोकांशी चर्चा केली. बांधकाम व्यवसायासंबंधित सर्व गोष्टींचा अभ्यास करून त्या चार मित्रांसोबत एक प्लॉट विकत घेऊन स्वतःच बांधकाम व्यवसायात ते उतरले. त्याच प्लॉटवर त्यांनी अपार्टमेंट बांधली आणि बांधकाम व्यवसायाचा श्रीगणेशा केला. यानंतर सचिन यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही. आजपर्यंत एकामागोमाग एक असे छोटे-मोठे तब्बल ३०बांधकाम प्रकल्प त्यांनी पूर्ण केले. हे प्रकल्प संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात उभारले गेले.सचिन भोसले हे आज बांधकाम क्षेत्रातील सुप्रसिद्ध 'व्हिएनएस व्हिजन' ग्रुपचे अध्यक्ष आहेत. बांधकाम क्षेत्रामधील त्यांच्या भरीव कामगिरीबद्दल त्यांची 'मी मराठी' चॅनेलवर विशेष मुलाखतदेखील प्रसिद्ध झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्यावतीने सचिन यांना एका प्रकल्पासाठी पुरस्कारानेदेखील गौरविण्यात आले आहे.' प्रचंड आत्मविश्वास, नवीन काहीतरी करून दाखविण्याची धडाडी, जबरदस्त जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि सतत नवनवीन करण्याचा ध्यास! हे सर्व गुण अंगात ठासून भरलेल्या सचिन भोसले यांना पुढील वाटचालीसाठी अनेकानेक शुभेच्छा...!

**संकलन –संयोजन, सुबोध रणशेवरे**




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# शेतकरी विरोधी कृषी कराराची परळीत प्रतिकात्मक होळी



■ परळी /प्रतिनिधी

अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार कराराबाबत राज्य सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याने बीड किसान सभेकडून या कराराची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. परळी तालुक्यातील कावळेवाडी, बोधेगाव या ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्र येत या कराराचा तीव्र निषेध केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी येथे आयोजित महा एक्स्पो २०२६ पशुप्रदर्शनात भारत-अमेरिका व्यापार कराराचे स्वागत करत अमेरिकेची मोठी बाजारपेठ भारतासाठी खुली झाल्याचे सांगितले होते. या निषेधार्थ किसान सभेच्या आवाहनाला प्रतिसाद देत परळी तालुक्यातील कावळेवाडी, बोधेगाव या ठिकाणी परिसरातील गावातील शेतकऱ्यांनी मंगळवार दि 17 रोजी एकत्र येत या कराराची प्रतिकात्मक होळी केली. सोयाबीन, इथेनॉल, जीएम सोयाबीनपासून तयार खाद्यतेल, पशुखाद्य, सुकामेवा, फळे-भाज्या व पोल्ट्री उत्पादनांवरील सवलतीमुळे भारतीय बाजारपेठेवर विपरीत परिणाम होणार असल्याचा दावा यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला. सोयाबीनचा हमीभाव ५३३० रुपये असताना शेतकऱ्यांना सुमारे साडेतीन हजार रुपयांत विक्री करावी लागत असल्याचे सांगत भावांतर योजनेतून नुकसानभरपाई देणार का, असा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांची दिशाभूल करणाऱ्या सरकार विरोधात यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली



# रक्तदानातून समाजसेवेची खरी शिवजयंती साजरी : सौ. सारिका अमोल सोळंके

## नागापूर सार्वजनिक शिवजयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

■ परळी | प्रतिनिधी

नागापूर येथे सार्वजनिक शिवजयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत रक्तदान केले. महिलांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय ठरली.

यावेळी रक्तदान केल्यानंतर सौ. सारिका अमोल सोळंके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शिवजयंती हा केवळ उत्सव नसून ती आपल्यासाठी प्रेरणेचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण केले. त्यांच्या कार्यातून आपण समाजासाठी काहीतरी देण्याची शिकवण घेतली पाहिजे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. आज शिवजयंती निमित्त रक्तदान करून आम्हाला समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडल्याचा आनंद आणि अभिमान वाटतो. पुढील काळातही अशा समाजोपयोगी उपक्रमांत सक्रिय सहभाग घेण्याचा आमचा निर्धार आहे असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमास नागपूर परिसरातील ग्रामस्थ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युरिया मिसळून पशुखाद्य तयार करणाच्या कारखान्यावर कारवाई- ची मागणी :


■ मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील पशुखाद्य उद्योगामध्ये भेसळ, निकृष्ट दर्जाचे घटक वापरणे व औद्योगिक दर्जाच्या रसायनांचा वापर यासारख्या गैरप्रकारांबाबत अलीकडच्या काळात गंभीर प्रश्न उपस्थित होत असून पशुधन व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने या विषयाकडे लक्ष वेधले जात आहे. पशुखाद्य निर्मिती प्रक्रियेत गुणवत्ता नियंत्रण व नियामक देखरेखीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी या संदर्भात शासनाकडे निवेदन सादर करून पशुखाद्य उद्योगातील गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी संबंधित प्रकरणांबाबत उपलब्ध कागदपत्रे व तपास अहवाल शासनाकडे सादर करून पशुधन, दुग्ध उत्पादने व ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कारवाई, गुणवत्ता तपासणी वाढविणे व नियामक यंत्रणा अधिक सक्षम करण्याची मागणी केली आहे.

याच पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील गोदरेज अँग्रोव्हेट पशुखाद्य कारखान्याचे प्रकरण उदाहरण म्हणून चर्चेत आले आहे. दि. 21/03/2025 रोजी या संदर्भात गुन्हा नोंद झाल्याची माहिती उपलब्ध असून संबंधित प्रकरणाची चौकशी व प्रशासकीय प्रक्रिया सुरू आहे.

एफआयआरमध्ये जोडलेल्या ई-वे बिल व डिलिव्हरी चलनानुसार फेब्रुवारी ते मार्च 2025 दरम्यान गोदरेज युनिटसाठी अनेक तुकड्यांमध्ये टेक्निकल ग्रेड युरियाची खरेदी व वाहतूक करण्यात आल्याची नोंद आहे. संबंधित कागदपत्रांनुसार हा युरिया औद्योगिक वापरासाठी असल्याचे नमूद करण्यात आले असून तो पशुखाद्यासाठी योग्य नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.


महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मंत्रालय )विस्तार(, दालन क्र ,५१८.मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०० ०३२.
ई-मेल- us.adf4-mh@gov.in

क्रमांकः- संकिर्ण-१२२५/प्र.क्र. १७३/पदुम-४
दिनांक- १९ डिसेंबर, २०२५.

प्रति,
आयुक्त पशुसंवर्धन ,
महाराष्ट्र राज्य औंध पुणे-६७

विषयः-औद्योगिक दर्जाच्या यूरियाच्या बेकायदेशीर व हानिकारक वापरामुळे गोदरेज पशुखाद्य तयार करणारे युनिट कायमस्वरुपी बंद करण्याबाबत.
संदर्भ :-वसंत संपतराव मुंडे श्री. बालाजी ट्रेडर्स, गौरी कुंज, मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड यांचे दि.२०.११.२०२५ चे पत्र.

महोदय,
उपरोक्त संदर्भ व विषयानुसार वसंत संपतराव मुंडे यांचे दि. २०.११.२०२५ चे पत्र सोबतप्रमाणे जोडून देण्यात येत आहे. कृपया पत्राचे अवलोकन व्हावे.
त्याअनुषंगाने याबाबत उचित कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करावा ही विनंती.

आपला,
(डॉ. नरेश बांगर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.



प्रयोगशाळेच्या तपासणी अहवालानुसार पशुखाद्याच्या नमुन्यामध्ये युरियाचे अंश आढळून आले असून त्यामध्ये टीएन 46.06 व बेंझीन द्रावणीय घटक आढळल्याची नोंद करण्यात आली आहे. या घटकांमुळे जनावरांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

तपासातील नोंदींनुसार संबंधित बॅच क्रमांक व खरेदी व्यवहारांमध्ये काही कंपन्यांच्या पुरवठा साखळीचा उल्लेख करण्यात आला आहे. या प्रकरणात पशुखाद्य, अन्न सुरक्षा व सार्वजनिक सुरक्षा संदर्भातील विविध कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हे नोंद करण्यात आले असून तपास प्रक्रिया सुरू आहे.

पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न गंभीर असल्याने पशुखाद्य निर्मिती उद्योगावर अधिक कडक नियंत्रण, गुणवत्ता तपासणी व नियामक यंत्रणांची देखरेख वाढविण्याची गरज व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांना पेरणीच्या काळात युरिया उपलब्धतेचा प्रश्न असताना औद्योगिक वापराच्या युरियाच्या पुरवठा साखळीची पारदर्शक चौकशी करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

या प्रकारच्या घटनांमुळे पशुधनाच्या आरोग्यावर परिणाम होण्याबरोबरच अन्नसाखळीमार्फत मानवाच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पशुपालक, दुग्ध संस्था व ग्राहकांचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी पशुखाद्य उद्योगातील गुणवत्ता नियंत्रण व वैधानिक जबाबदाऱ्या काटेकोरपणे अंमलात आणण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. न्यायवैद्यकीय व प्रयोगशाळेतील तपास, पशुधन व ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित बाबी तसेच प्रशासकीय प्रक्रियेच्या अनुषंगाने संबंधित प्रकरणांबाबत शासनस्तरावर पुढील निर्णय प्रक्रियेची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक : डॉ. राजेंद्र बगाटे

भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे.

सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दख्खनमधील आदिलशाही–कुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक-सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.

इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. “हे राज्य रयतेचे आहे” हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.

शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक-नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण-महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.

स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.

लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन-मर्यादेतून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि



स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.

शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.

धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धर्माधारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.

स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.

राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.

शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता-समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला ‘रियलपोलिटिक’ म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते.

महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.

ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना “बंडखोर सरदार” म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात “स्वराज्य” हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.

शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना ‘सर्वसमावेशक शासक’ म्हणून पाहिले जाते.

स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती.

प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.

आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात.

समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात.




***डॉ. राजेंद्र बगाटे***
***(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)***
***ईमेल - bagate.rajendra5@gmail.com***



# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीडमध्ये राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थितीत राजधानी दिल्ली गाजवलेला मर्दानी खेळांचा जल्लोष !

## मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन

## कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे गंगाधर काळकुटे यांचे आवाहन





**बीड | प्रतिनिधी :**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीड शहरात आज (दि. 19 फेब्रुवारी) सायंकाळी 06 वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर तत्कालीन महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोविंद जी यांच्या उपस्थितीत दिल्ली येथील कार्यक्रम गाजवणारे, पारंपरिक मर्दानी खेळांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शिवकालीन शौर्य, पराक्रम आणि परंपरेची आठवण करून देणारा हा दिमाखदार सोहळा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

या कार्यक्रमात कोल्हापूर येथील नामांकित पथकाकडून पारंपरिक मर्दानी खेळांचे थरारक सादरीकरण करण्यात येणार असून तलवारबाजी, लाठी-काठी, दांडपट्टा आदी कौशल्यपूर्ण प्रकार प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. शिवकालीन परंपरेची झलक आणि शौर्याची अनुभूती देणारे अनेक चित्तथरारक दृश्ये या कार्यक्रमात सादर केली जाणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा कार्यक्रम युवकांमध्ये पराक्रम, शिस्त आणि संस्कार यांची प्रेरणा निर्माण करणारा ठरणार आहे. बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक राजे संभाजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष, मराठा सेवक गंगाधर काळकुटे पाटील यांनी केले आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने बीडमध्ये पारंपरिक संस्कृतीचा आणि शौर्याचा हा सोहळा उत्साहात साजरा होणार असून नागरिकांमध्ये याबाबत मोठी उत्सुकता दिसून येत आहे.

# गणेश काशिनाथ गावडे यांची मंडळ अधिकारी पदी पदोन्नती



**प्रतिनिधी- सोपान पगारे**

तालुक्यातील निमगाव बोडखा (गावडे वस्ती ) येथील गणेश काशिनाथ गावडे, यांची ठलाठी पदावरून प्रमोशन होऊन मंडल महसूल अधिकारी पदी निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे वाहिरा, निमगाव बोडखा, घोगडेवाडी, व तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**शिक्षणाचा खडतर प्रवास**

गणेश गावडे यांचे यश हे त्यांच्या मेहनतीचे आणि योग्य नियोजनाचे फलित आहे. त्यांचा शैक्षणिक प्रवास खालीलप्रमाणे राहिला आहे:

त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमगाव बोडखा व माध्यमिक शिक्षण विठ्ठल विद्यालय निमगाव बोडखा, तर

उच्च माध्यमिक जनता कॉलेज धानोरा येथे झाले आहे आणि पदवी धोंडे कॉलेज कडा आशे झाले आहे..

**सर्वत्र कौतुकाचा वर्षाव**

एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुणाने प्रशासकीय सेवेत मारलेली ही भरारी तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. गणेश गावडे, यांच्या निवडीचे वृत्त समजताच, वाहिरा, निमगाव बोडखा, व पंचकृषित संपूर्ण आष्टी तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# टेंभी ग्रामपंचायतचे उपक्रमशील सरपंच अमोल चिकने यांच्या संकल्पनेला गावकऱ्यांची साथ

## लोकसहभागातून बसविले सीसीटीव्ही कॅमेरे गाव केले सुरक्षित

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील टेंभी ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून अनेक उपक्रमशील निर्णय मागील पाच वर्षात घेण्यात आले. गाव आणि ग्रामपंचायत ज्यावेळी एका विचाराने काम करते त्यावेळी त्या गावातील प्रत्येक समस्येचे निराकरण होते

सरपंच अमोल चिकणे यांच्या संकल्पनेतून ग्रामस्थांना आव्हान केले आपल्या गावाच्या सुरक्षे करिता आपण सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे या संकल्पनेला ग्रामस्थांनी हाकेला ओ देत लोकसहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले ज्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हे कार्य टेंभी ग्रामपंचायतीने पूर्णत्वास नेले ज्या कारण गाव सुरक्षित झाले

**गावाची सुरक्षा निश्चित झाली**

**गैरप्रकाराच्या हालचालीला बंधने येतील**

गावाची सुरक्षा सुरक्षित करण्याच्या दृष्टीतून गावकरी एकवटले या सहकार्याबद्दल ग्रामस्थांचे अभिनंदन करतो गावाचा सर्वांगीण विकास शासनाच्या विविध योजना आणि लोकसहभाग हा महत्त्वाचा असतो आज टेंभी येथील ग्रामस्थांनी सिद्ध केले ग्रामपंचायतच्या प्रत्येक निर्णयांमध्ये सहकार्य करून आपले गाव विकसित करायचे हा ध्यास टेंभी ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्या एकत्रित विचारातून परिपूर्ण होत असताना दिसून येत आहे गावकरी तेच राव करी





# राज्य बालनाट्य स्पर्धेत बेला नाटकाला द्वितीय पारितोषिक

## परळीच्या भेल सेकंडरी स्कूलच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**परळी (प्रतिनिधी)**

राज्य शासनाच्या २२ व्या राज्य बालनाटय स्पर्धेत बेला नाटकाला द्वितीय पारितोषिक मिळाले असून या नाटकाने अंतिम फेरीत स्थान मिळविले आहे. या सह बेला नाटकातील कलावंतांना सहा वैयक्तीक बक्षीसे मिळाली आहे.

पहिल्यांदाच परळी येथील नाटकाला सात बक्षीस मिळाले आहे.

छत्रपती सेवाभावी संस्थेच्या वतीने बेला नाटकाने संभाजीनगर विभागांतर्गत हे यश मिळविले आहे. या नाटकाचे उत्कृष्ट दिग्दर्शन आसीफ शेख यानी केले असुन बाल कलाकारांनी जबरदस्त मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवून दिले आहे. या नाटकाच्या दिग्दर्शनासाठी आसीफ शेख यांना द्वितीय बक्षीस मिळाले तर संगीतसाठी अतुल साळवे यांना द्वितीय बक्षीस, वेशभूषेसाठी अनिल गोटमोकले यांना द्वितीय बक्षीस, प्रकाश योजनेसाठी मानिकचंद थोरात यांनातृतीय बक्षीस, रंगभूषासाठी विश्रांत लशकारे यांना तृतीय बक्षीस मिळाले आहे. सारा गित्ते

यांना अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले. एकूण ४९ नाटकात या नाटकाने दुसरे स्थान मिळविले आहे. नाटकात भेल सेकंडरी स्कूलचे कलाकार

त्रिशा यादव, सारा गीत्ते, आयुष पीसे,

वरद चाटे, शिवम चाटे, आर्यवर्धन फड

अजय शिंदे, मयुरेश खोत, प्रणव चव्हाण,

महेश नागरगोजे, पार्थ कासार,अर्जुन भताने, अर्नव मुंडे, वेदप्रकाश कावरे, स्वरा घुगे, ईश्वरी शेळके, स्नेहल शेळके यांनी अभिनय केला. प्रकाश योजना माणिकचंद थोरात, संगीत अतुल साळवे,

नेपथ्य शेख अकबर, रंगभूषा विश्रांत लशकारे, वेशभूषा अनिल गोटमोकले

रंगमंच व्यवस्था रोहिणी वाकडे, राहुल सुर्यवंशी यांनी केले.या यशाबद्दल

भेल शाळेचे प्राचार्य गीरीष ठाकुर यासह शिक्षक व पालकांनी शुभेच्छा दिल्या.

# घरकुलचे हप्ते वेळेवर आणि जिओ टॅगिंग लवकर द्या - जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

घरकुलचे हप्ते वेळेवर पडत नाहीत, त्यामुळे घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत आले आहेत. तसेच पंचायत समितीचे एमआरईजीएस विभागातील इंजिनिअर गायगोठा, जलसिंचन विहीर व इतर योजनांचा शेतकऱ्यांना फायदा घेण्यासाठी जिओ टॅगिंगला वेळेवर येत नाहीत, ज्यामुळे शेतकऱ्यांसमोर समस्या निर्माण होत आहे. आणि पंचायत समिती, अंबाजोगाईच्या अंतर्गत इतर ही अनेक समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे. तरी या संदर्भात पंचायत समिती प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व नागरिकांनी गटविकास अधिकारी यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपराव पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई यांना सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनातून एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी सोमवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, घरकुलचे हप्ते वेळेवर पडत नाहीत, त्यामुळे घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत आले आहेत. तसेच पंचायत समितीचे एमआरईजीएस विभागातील इंजिनिअर गायगोठा, जलसिंचन विहीर व इतर योजनांचा शेतकऱ्यांना फायदा घेण्यासाठी जिओ टॅगिंगला वेळेवर येत नाहीत, ज्यामुळे शेतकऱ्यांसमोर समस्या निर्माण होत आहे. आणि पंचायत समिती, अंबाजोगाईच्या अंतर्गत इतर ही अनेक समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे. तरी या संदर्भात पंचायत समिती प्रशासनाने तात्काळ उपरोक्त समस्यांचे निराकरण करावे, योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व नागरिकांनी गटविकास अधिकारी यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे. सदरील निवेदनाच्या प्रती माहितीस्तव जिल्हाधिकारी, बीड आणि तहसीलदार, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरील निवेदनावर बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष जहाँगीर पठाण, शहराध्यक्ष ऋषिकेश मोरे, सरपंच अंबादास हारकळ, विजयानंद सोळंके, विजय चव्हाण, सुधीर उपाडे, ओमकार चव्हाण, दयानंद गुजर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यासंदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलताना जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी सांगितले की, सदरील समस्यांचे निराकरण लवकरात लवकर न झाल्यास पंचायत समिती कार्यालय अंबाजोगाई यांच्या विरोधात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपराव पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली व शेतकरी, योजनांचे लाभार्थी नागरिक यांच्या सहभागातून तीव्र आंदोलन करावे लागेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.